# नवी लाट

www.new-wave-nw.blogspot.com
www.newwavemaha.wordpress.com

'नवी लाट' ही एक क्रांतीकारी समाजवादी संघटना आहे, जी भारतात बोल्शेविक लेनिनवादी पक्ष आणि ४थी अंतरराष्ट्रीय बांधत आहे.

**भाववाढ थांबलीच पाहिजे! कामगारांच्या अधिकारांचे रक्षण झालेच पाहिजे! उलथवा हे भांडवलदारांचे सरकार! क्रांतीचा ध्वज उंच धरा!**

## सार्वत्रिक संपाला आमचा पूर्ण पाठिंबा!

अन्नधान्याच्या किमतीत १७% वाढ! कामगार कपातीमुळे असुरक्षितता! सामाजिक दृष्ट्या असुरक्षित सामान्य आणि ग्रामीण कामगार! सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणूक!

ह्यां मुळे देशात एक आणीबाणीसदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे. ह्यामुळे सर्वात घाबरट युनियन्स देखिल ह्या संपाला पाठिंबा देत आहेत.

आम्ही ह्या सार्वत्रिक संपाला पूर्ण पाठिंबा देतो.

फक्त कामगारांचे भांडवलशाहीवर सतत आक्रमणच भारतात खरा बदल घडवून आणू शकेल. 'सार्वत्रिक संप' हे कामगारांच्या हातातील शक्तिशाली अस्त्र आहे. एक दिवसाचा संप देखिल जगाला दाखवून देऊ शकतो की खरं जग कोण चालवतो. विचार करा जर असाच संप अनिश्चीत काळासाठी चालू राहिला तर!

आपल्या मागण्या फक्त एका दिवसाच्या संपाने पूर्ण होणार नाहीत मग तो संप कितीही तिव्र का असेना म्हणूनच आपल्याला असा संप अनिर्णयीत काळासाठी सुरू ठेवला पाहिजे.

अशा प्रकाराच्या संपांच्या योजना केवळ युनियन लीडर आणि जनवादी संघटनांच्या प्रमुखांवर सोडण्याने यशस्वी होणार नाहीत. कोणत्याही आंदोलनाचा पाया हा लोकांच्या लोकशाही सहभागावरच अवलंबून असतो. आमचा प्रस्ताव आहे की अशा संपांच्या योजना ह्या लोकांच्या **लोकशाही** सहभागावर उभ्या कराव्यात.

आपल्या मागण्या देखिल अजुन सुधारल्या पाहिजेत.

महागाई हा एक अनैच्छिक कर आहे जो सामान्य जनतेवर थोपला जातो. ह्या विरूद्ध लढण्यासाठी केवळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे सार्वत्रिकरण पुरेसे नाही. ह्यासाठी आपल्याला ही मागणी केली पाहिजे की प्रत्येक महिन्यात महागाईच्या प्रमाणात पगारवाढ करावी.

बेरोजगारीशी लढण्यासाठी, खाजगी कंपन्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी चुकीची आहे. भांडवलदार फक्त जनतेचा पैसा खिशात घालतात ह्यामुळे रोजगार वाढणार नाही आणि कामगारांच्या अधिकारांचे रक्षणही होणार नाही.

आपल्याला सर्वांसाठी रोजगार हवा आहे आणि त्यसाठी सरकारच्या ठोस योजना हव्या आहेत. रोजगाराचा अधिकार हा मूलभूत अधिकार झालाच पाहिजे.

निर्गुंतवणुकिशी लढण्यासाठी, खाजगी क्षेत्राला दिली जाणारी मदत बंद करणे आवष्यक आहे. आपल्याला सार्वजनिक क्षेत्राला मजबूत केले पाहिजे. कामगारांच्या अधिकारांच्या रक्षणासाठी आपल्याला खाजगीकरणाचा विरोध केला पाहिजे. अंतिमतः आपले उद्दिष्ट उद्योगांचे पूर्ण राष्ट्रीयीकरण हेच असले पाहिजे.

आपली अंतिम मागणी हीच आहे की संप करण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार झालाच पाहिजे.

केंद्रीय कॉंग्रेस सरकार आणि बुर्ज्वा विरोधी पक्ष (भा.ज.प.) हे कामगार आणि सामान्य लोकांच्या मागण्या पूर्ण करणार नाहीत. उलट ते 'ऑपरेशन ग्रीन हंट'च्या रूपाने आपल्या शेतकरी बांधवांना मृत्यू आणि क्लेशच देउ शकतात.

पश्चिम बंगाल आणि केरळची सरकारे (डाव्या अघाडीच्या नेतृत्वाखालिल) जी कामगार आणि कष्टकऱ्यांची सरकारे असल्याचा दावा करतात ते देखिल महागाई नियंत्रणात अणण्यासाठी ठोस पावले उचलत नाहीत जसे की खाद्यान्नाच्या किमती गोठवणे, बाजाराचे व्यवहार गोठवणे किंवा आवश्यक वस्तूंचे भाव नियंत्रणात ठेवणे.

फक्त कामगार आणि कष्टकर्यांचे सरकारच राष्ट्रीय संपत्ती ज्यांनी ती निर्माण केली त्यांना वाटू शकेल.

**कामगारांचा लढा चिरायु होवो! न्यू वेव्ह मधे सामिल व्हा! चला एक नवी क्रांतीकारी समाजवादी संघटना निर्माण करूया!**

### आमच्याबरोबर लढयात सहभागी व्हा!

**चर्चेला या ः संपानंतर काय?** आणि न्यू वेव्ह च्या खास अंकाचे प्रकाशन (विषय ःट्रॉटस्की आणि BLPI)

१२ सप्टेंबर २०१०, दुपारी १:३० ते ४:३०, स्थळः लोकायत हॉल, लेनोव्हो कॉम्प्लेक्स, सिंडीकेट बॅंकेसमोर, नळ स्टॉप, पुणे.